# हरिनामात दंग विठ्ठलभक्त पंढरपूरकडे रवाना

## एसटी कर्मचाऱ्यांसाठी मोफत जेवणाची व्यवस्था



**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, (दि.2)** - आषाढी एकादशीच्या पवित्र पर्वासाठी पंढरपूरच्या दिशेने वारकऱ्यांचा प्रवास जोमात सुरू असून, अमरावती जिल्ह्यातून मोठ्या संख्येने भाविक विठ्ठल-रुक्मिणीच्या दर्शनासाठी निघाले आहेत. भाविकांच्या सोयीसाठी महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाने (रूस्त्रञ्ष्ट) विशेष बससेवेचे आयोजन केले आहे.

30 जूनपासूनच या विशेष सेवेची सुरुवात करण्यात आली असून, 18 एसटी बसमार्फत आतापर्यंत 700 हून अधिक वारकरी पंढरपूरकडे रवाना झाले आहेत. यंदा 1 जुलैपासून विशेष बस सुरू करण्याचे नियोजन होते, मात्र प्रवाशांचा उत्स्फूर्त प्रतिसाद पाहून सेवा लवकर सुरू करण्यात आली. पंढरपूर यात्रेतील मुख्य आकर्षण रिंगण सोहळा यावर्षी 4 जुलै रोजी पार पडणार असल्याने, अनेक वारकरी पूर्वतयारीसाठी दोन दिवस आधीच पंढरपूर गाठत आहेत. यात्रेच्या सुरळीत आयोजनासाठी राज्य परिवहन महामंडळाने 175 विशेष बस पंढरपूरसाठी सोडण्याची योजना आखली आहे. अमरावती जिल्ह्यातील सर्व 7 बस डेपोंमधून ही वाहतूक सुरू आहे. वाहतूक अधिकारी योगेश ठाकरे यांनी दिलेल्या माहितीनुसार, 40 प्रवासी पूर्ण होताच बस त्वरित पंढरपूरकडे रवाना केली जाते आणि त्याऐवजी दुसऱ्या बसची तत्काळ व्यवस्था केली जाते. भाविकांसोबतच सेवा देणाऱ्या एसटी चालक, वाहक व कर्मचाऱ्यांसाठीही विशेष मोफत जेवणाची व्यवस्था करण्यात आली आहे. 5 ते 7 जुलै या काळात भीमा बस डेपो (पंढरपूर) येथे पोहोचणाऱ्या कर्मचाऱ्यांसाठी नाश्ता, जेवण व रात्रीचे जेवण मोफत दिले जात आहे. विशेषतः 6 जुलै रोजी, आषाढी एकादशीच्या दिवशी, त्यांच्यासाठी साबुदाणा खिचडी, केळी आणि राजगिरा लाडू यांची व्यवस्था आहे. राज्यभरातून येणाऱ्या लाखो भाविकांसाठी यंदा एकूण 5,200 एसटी बसेस सोडण्यात येणार आहेत, अशी माहिती महामंडळाच्या वतीने देण्यात आली आहे.

### जिल्ह्याच्या आगारातून सुटणाऱ्या बसेस

| डेपो | बस क्रमांक |
|---|---|
| अमरावती | 29 |
| बडनेरा | 25 |
| परतवाडा | 26 |
| वरुड | 20 |
| चांदूर रेल्वे | 15 |
| दर्यापूर | 20 |
| मोर्शी | 20 |
| चांदूर बाजार | 20 |
| एकूण | 175 |

### असे आहेत एसटीचे बस भाडे

| | |
|---|---|
| अमरावती-पंढरपूर | 946 रुपये |
| दर्यापूर-पंढरपूर | 926 रुपये |
| परतवाडा-पंढरपूर | 1026 रुपये |
| वरुड पंढरपूर | 1096 रुपये |
| चांदूर रेल्वे पंढरपूर | 997 रुपये |
| मोशी-पंढरपूर | 1036 रुपये |
| चांदूर बाजार पंढरपूर | 1007 रुपये |

# प्रलंबित मागण्यांबाबत समस्या निवारण सभा

## समस्या तुमच्या, पुढाकार आमचा उपक्रम



**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, (दि.2)**- 'समस्या तुमच्या, पुढाकार आमचा' या उपक्रमांतर्गत आश्रमशाळांतील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या दीर्घकालीन प्रलंबित समस्यांबाबत विदर्भ माध्यमिक शिक्षक संघाच्या पुढाकाराने नुकतीच एक महत्वपूर्ण समस्या निवारण सभा अमरावती येथील प्रादेशिक उपसंचालक विजय साळवे यांच्या कार्यालयात पार पडली. या सभेला आमदार व संघाचे प्रांतीय सरकार्यवाह सुधाकर अडबाले प्रमुख उपस्थित होते. अमरावती विभागातील पाचही जिल्ह्यांचे सहाय्यक संचालक व विविध संबंधित अधिकारी यावेळी उपस्थित होते.

गेल्या सात-आठ वर्षांपासून राज्यात अतिरिक्त शिक्षकांचे समायोजन न केल्याने आश्रमशाळांमध्ये शिक्षक व कर्मचाऱ्यांची संख्या अनावश्यकरीत्या वाढली आहे. शासनाच्या स्पष्ट निर्देशानुसार समायोजन प्रक्रिया राबवण्याची गरज असूनही अमरावती प्रादेशिक उपसंचालकांनी काहीशा तकलादू कारणास्तव याचे आदेश रद्द केल्याची गंभीर बाब आमदार अडबाले यांनी उघड केली. यामुळे शासनावर वेतनाचा कोट्यवधी रुपयांचा आर्थिक भार पडत असल्याचे त्यांनी नमूद केले. गेल्या दोन वर्षांत विभागात दिलेल्या नवीन पदमान्यतेबाबत माहिती विचारल्यावर उपसंचालकांनी मौन बाळगल्यामुळे बोगस पदभरती झाल्याची शंका अधिकच बळावली. तसेच 15 मे 2019च्या शासननिर्णयानुसार पवित्र पोर्टलचा वापर टाळण्यात आला. टेट उत्तीर्ण नसलेल्या शिक्षकांना मान्यता देऊन, विहित मुदतीत टेट परीक्षा न देतानाही त्यांची सेवा सुरू ठेवण्यात आली आहे, हे गंभीर स्वरूपाचे असल्याचे आमदारांनी निदर्शनास आणले. अनेक कर्मचाऱ्यांचे भ.नि.नि. हिशोब, अंतिम प्रदान, निवृत्ती लाभ आणि वैद्यकीय प्रतिपूर्ती प्रस्ताव गेल्या तीन वर्षांपासून प्रलंबित आहेत. यामुळे निराश झालेल्या 25 कर्मचाऱ्यांनी आत्मदहनाचा इशारा दिला आहे. सहाय्यक संचालकांकडून दुर्लक्ष होत असल्याचा आरोप करीत आमदार अडबाले यांनी संताप व्यक्त करत सर्व प्रकरणे सात दिवसांत मार्गी लावण्याचे आदेश अधिकाऱ्यांना दिले.

या बैठकीस संघाचे प्रांतीय अध्यक्ष अरविंद देशमुख, विज्युक्टा अध्यक्ष डॉ. अविनाश बोर्डे, जयदीप सोनखासकर, विजय ठोकळ, बाळासाहेब गोटे, दशरथ रसे, अतुल देशमुख, अरविंद चौधरी, किशोर नगराळे, दिनेश चौधरी, बोरकर सर, वसंत कोंडेकर, किशन पुंड, प्रमोद मुनेश्वर, बंडू बोरकर, गायकवाड सर, आशिष ढोके, प्रदीप ढोबळे, उद्धवराव वानखडे, महेश इंगळे, प्रवीण राठोड, प्रवेश राठोड, संतोष जाधव, देवसिंग राठोड, गौतम वाघ, बबन राठोड, संतोष दीवटे आदी कार्यकर्ते व शिक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# राजेश पहुरकर यांचा सेवानिवृत्ती सत्कार सोहळा



**महासागर प्रतिनिधी**

**अंजनगाव बारी**- जनता माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, अंजनगाव बारी येथील प्रयोगशाळा सहाय्यक राजेश शांताराम पहुरकर यांची नियत वयोमानानुसार 3 जून रोजी सेवानिवृत्ती झाली. यानिमित्ताने शाळेच्या सभागृहात त्यांच्या सेवानिवृत्ती सत्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जनता विद्यालयाचे सभापती महादेव चकुले होते. प्रमुख पाहुणे म्हणून गांधी विद्यालय बडनेराचे सभापती रामेश्वर लाड, न्यू एज्युकेशन सोसायटी बडनेराचे सोमेश्वर इंगोले, प्राचार्य विनोद मुगल आणि पर्यवेक्षक गजेंद्र अवघड यांची उपस्थिती लाभली होती. कार्यक्रमाची सुरुवात स्वर्गीय भाऊसाहेब दातीर व सरस्वती मातेच्या पूजन व दीपप्रज्वलनाने झाली. प्रास्ताविक प्राचार्य विनोद मुगल यांनी करताना पहुरकर यांचे कार्य, योगदान आणि कुटुंबाची माहिती दिली. न्यू एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष डॉ. हेमंत देव व उपाध्यक्ष राजूभाऊ टारपे यांनी शुभेच्छा दिल्या.

सत्कारमूर्ती राजेश पहुरकर व त्यांच्या पत्नी भूमिका पहुरकर यांचा महादेव चकुले यांच्या हस्ते शाल, श्रीफळ, भेटवस्तू व सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला. रामदास ब्राह्मणे, गजेंद्र अवघड यांच्या हस्ते धनादेश देऊनही सत्कार करण्यात आला. या प्रसंगी शिक्षक महेंद्र उराडे व रामदास ब्राह्मणे यांनी मनोगत व्यक्त केले. आपल्या भाषणात राजेश पहुरकर यांनी शाळेत घालवलेले आठवणींना उजाळा दिला. गजेंद्र अवघड यांनी त्यांच्या शांत, सुस्वभावी आणि सर्वांशी स्नेहाने वागणाऱ्या व्यक्तिमत्त्वावर प्रकाश टाकला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अमोल डवरे यांनी केले. यावेळी शाळेतील शिक्षकवृंद, शिक्षकेत्तर कर्मचारी, तसेच पहुरकर यांचा पुत्र ऋतुराज, कन्या ऋतुजा, भाऊ व इतर आप्तमित्र मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# डॉ. पंजाबराव देशमुख स्मृती वैद्यकीय महाविद्यालयात वृक्षारोपण

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, (दि. २)** - श्री शिवाजी शिक्षण संस्थेच्या अंतर्गत संचालित डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख स्मृती वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाच्या संलग्न ग्रंथालय परिसरात आज वृक्षारोपणाचा उपक्रम यशस्वीरित्या पार पडला. या कार्यक्रमाचे उद्घाटन महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. अनिल देशमुख यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आले. वृक्षारोपणात बकुळ, कडूनिंब, वड, पिंपळ, आवळा अशा विविध प्रकारच्या वृक्षांची लागवड करण्यात आली. कार्यक्रमादरम्यान वैद्यकीय अधीक्षक डॉ. पवन टेकाडे, रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ. वसंत लुंगे, तसेच डॉ. कृष्णा विल्हेकर, डॉ. अजय जावरकर, डॉ. सुषमा पांडे, डॉ. रामावतार सोनी, डॉ. गौरव दुबे, डॉ. राहुल देशमुख, डॉ. अनंत काळबांडे, डॉ. सुबोध निस्ताने, डॉ. विठ्ठल खानंदे, डॉ. प्रकाश कुटे, डॉ. प्रिया वरभे, डॉ. स्वप्नील पाटील, डॉ. सुदेश दारव्हेकर, डॉ. उल्हास घोटकर, डॉ. श्रीकांत फुटाणे, क्रीडा अधिकारी संजय वाटाणे यांच्यासह महाविद्यालयातील इतर प्राध्यापक, कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. वृक्षारोपणास विद्यार्थ्यांचा मोठा प्रतिसाद लाभला. यामध्ये वैदेही काळे (जनरल सेक्रेटरी), अमय कुलट, भूषण पाटणे, अभिजीत कांडलकर, गौरव राऊत, वृषाली देशमुख, राजेंद्र देशमुख इत्यादींनी सहभाग घेतला. कार्यक्रमाचे आयोजन पर्यावरण संवर्धनाच्या दिशेने एक महत्त्वपूर्ण पाऊल असल्याचे अधिष्ठात्यांनी आपल्या भाषणात सांगितले.

# पोटे पाटील आयुर्वेद रुग्णालयात आज येणार यकृत रोग तज्ञ

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, (दि.2)**- यकृत व त्यासंबंधीचे आजार मोठ्या प्रमाणात वाढत असून अश्या आजाराचे तात्काळ निदान व उपचार झाल्यास हा जीवघेणा आजार बरा होऊ शकतो. याचा विचार करून सुप्रसिद्ध यकृत विकार तज्ञ डॉ. चरण सोनारे गुरुवार दिनांक 3 जुलैला सकाळी 9 ते 11 वाजेपर्यंत पी. आर. पोटे पाटील आयुर्वेद रुग्णालयात रुग्ण तपासणी, उपचार व मार्गदर्शन करतील. या शिबीरात कावीळ, मलबद्धता, आम्लपित्त, यकृतावर सूज येणे, फॅटी लिव्हर, रक्तातील बिलीरूबीन वाढणे, लिव्हर शिरॉसिस जलोधर, रक्ताची किंवा काळपट वांती होणे, सतत पोट दुखने आदी त्रास किंवा लक्षणे असणाऱ्यांनी पूर्ण रिपोर्टसह पोटे आयुर्वेद रुग्णालयात उपस्थित राहून लाभ घ्यावा. असे आवाहन वैद्यकीय अधिक्षक डॉ. श्याम भुतडा यांनी केले आहे.



## रवीनगर रस्त्यावरील अनधिकृत होर्डिंग काढले

**अमरावती** - जाहिरातीचे फ्लेक्स, बॅनर, होर्डिंगवर मुद्रक व प्रकाशकाचे नाव टाकणे अनिवार्य आहे. तसेच बाजार व परवाना विभागाची परवानगी घेणेही आवश्यक आहे. मात्र असे न केल्याने झोन क्र. 2 अंतर्गत येणाऱ्या रवीनगर येथील अनधिकृत मोठे जाहिरात बॅनर जेसीबीच्या मदतीने जमीनदोस्त करण्यात आले. मनपा आयुक्तांच्या आदेशाने ही कारवाई बाजार व परवाना विभागासह अतिक्रमण निर्मूलन पथकाने केली.

# शिक्षक समस्या : विभागीय आयुक्तांच्या अध्यक्षतेत बैठक आज

## पाचही जिल्ह्याचे अधिकारी राहतील उपस्थित




**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, (दि.2)** - शिक्षक व विद्यार्थ्यांच्या विविध प्रलंबित समस्यांबाबत प्रहार शिक्षक संघटनेच्या वतीने 16 ते 18 जून दरम्यान आयुक्त कार्यालयावर करण्यात आलेल्या बेमुदत उपोषण आंदोलनाची अखेर प्रशासनाने दखल घेतली आहे. त्यानुसार, 3 जुलै रोजी सकाळी 11 वाजता विभागीय आयुक्त श्वेता सिंघल यांच्या अध्यक्षतेखाली विभागीय बैठक आयोजित करण्यात आली आहे. या बैठकीस अमरावती विभागातील पाचही जिल्ह्यांचे मुख्य कार्यकारी अधिकारी, शिक्षणाधिकारी आणि संबंधित विभाग प्रमुख उपस्थित राहणार आहेत. संघटनेचे राज्याध्यक्ष महेश ठाकरे यांना देखील या बैठकीसाठी अधिकृत निमंत्रण पाठवण्यात आले आहे. शिक्षकांच्या प्रलंबित मागण्यांवर निर्णायक चर्चा होऊन काही महत्त्वाचे निर्णय या बैठकीत घेतले जातील, अशी अपेक्षा आहे.

16 ते 18 जून दरम्यान झालेले उपोषण आंदोलन तीव्र होत गेल्यानंतर, पोलिसांनी संघटनेच्या पदाधिकाऱ्यांना तिसऱ्या दिवशी स्थानबद्ध केले होते. या आंदोलनादरम्यान संघटनेने ग्रामीण शिक्षण व्यवस्था मोडीत काढणाऱ्या आणि शिक्षण हक्क कायद्याचे उल्लंघन करणाऱ्या 15 मार्च 2024 च्या संच मान्यतेच्या शासन निर्णयाच्या रद्दबातलतेची प्रमुख मागणी लावून धरली होती. याशिवाय जिल्हा स्तरावरील 25 महत्त्वाच्या मागण्या मांडण्यात आल्या होत्या.

### अत्यंत महत्वाची बैठक

या पार्श्वभूमीवर होणारी 3 जुलैची विभागीय बैठक संघटनेच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाची मानली जात आहे. संघटनेचे संस्थापक अध्यक्ष व माजी राज्यमंत्री बच्चू कडू यांच्या मार्गदर्शनाखाली होणारी ही बैठक शिक्षकांच्या संघर्षाचे फलित ठरेल, अशी अपेक्षा आहे. विभागीय आयुक्त श्वेता सिंघल यांनीही या बैठकीत प्रलंबित प्रश्न सोडवण्याबाबत आश्वासन दिले आहे. संघटनेचे अध्यक्ष महेश ठाकरे यांनी स्पष्ट केले आहे की, जोपर्यंत शिक्षक व विद्यार्थ्यांच्या समस्या मार्गी लागत नाहीत, तोपर्यंत संघटनेचा लढा सुरूच राहणार आहे. या बैठकीकडे शिक्षक वर्गाचे लक्ष लागून राहिले असून, निकालकारक निर्णयांच्या अपेक्षेने सर्वांमध्ये उत्सुकता आहे.



# तपोभूमीला कर्मभूमी मानून मातृभूमीचे ऋण फेडण्याचा आमदार सुलभा खोडके यांचा निर्धार

## अमरावतीत प्रभाग 2 मध्ये विविध विकास कामांचे भूमिपूजन

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, (दि.2)** - अमरावती ही सामाजिक आणि सांस्कृतिक विचारांची भूमी आहे. या शहराने स्वातंत्र्योत्तर काळात अनेक कर्मवीर घडवले असून, त्यांनी समाजहितासाठी त्याग, समर्पण आणि आत्मीयतेने काम केले. म्हणूनच या मातीला तपोभूमी म्हटले जाते. आता ही तपोभूमी कर्मभूमी मानून मातृभूमीचे ऋण फेडण्याचा मी प्रयत्न करत आहे. असे प्रतिपादन आमदार सुलभा खोडके यांनी केले.

रविवारी प्रभाग क्रमांक 2 (पीडीएमसी-तपोवन) अंतर्गत विविध पायाभूत विकास कामांचा शुभारंभ आमदार खोडके यांच्या हस्ते करण्यात आला. त्यांनी निवडणुकीपूर्वी दिलेल्या आश्वासनांची पूर्तता करण्यासाठी प्रभाग स्तरावर विकास कामांचा धडाका सुरू केला आहे.

विकासकामांमध्ये साई कॉलनीतील रस्त्याचे बांधकाम, ओमकार नगर ते म्हाडा बिल्डिंगपर्यंत रस्ता निर्माण, कृष्णा नगर येथे अवसरे ते इंगोले यांच्या घरापर्यंत रस्त्याचे बांधकाम, शिव कॉलनी छत्रपती पूलजवळ नालीचे बांधकाम, योगीराज नगर, अंबिका नगर आणि सुभाष कॉलनी येथील ओपन स्पेसला चेनलिंग फेन्सिंग, अंबिका नगरमधील अंतर्गत रस्त्याचे बांधकाम, रामकृष्ण दवे यांच्या घराजवळ नालीचे बांधकामांचा समावेश आहे.

याप्रसंगी आमदार खोडके यांनी पूजन, कुदळ मारून भूमिपूजन आणि नामफलकाचे अनावरण करून औपचारिकता पार पाडली. उपस्थित नागरिकांनी तपोवन परिसरातील समस्या मांडत निवेदन दिले. यावर आमदारांनी सर्व समस्यांवर त्वरित उपाययोजना करण्याची ग्वाही दिली. तपोवन भागात विकासाचे चक्र सुरू असून, भविष्यातही ही शृंखला अबाधित राहील, असा विश्वास आमदार खोडके यांनी व्यक्त केला. स्थानिक महिला आणि नागरिकांनी आमदारांचा सत्कार करून कृतज्ञता व्यक्त केली. कार्यक्रमाला परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# विद्यापीठाची आचार्य पदवी कोर्स वर्क परीक्षा 13 जुलैला

## संशोधनार्थ्यांनी वेळेवर तयारी करावी - विद्यापीठाचे आवाहन




**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, (दि.2)**- संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाची आचार्य पदवीसाठी आवश्यक असलेली कोर्स वर्क परीक्षा 13 जुलै 2025 रोजी सकाळी 11 ते दुपारी 2 वाजेपर्यंत घेण्यात येणार आहे. ही परीक्षा विद्याभारती महाविद्यालय (अमरावती), सीताबाई कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय (अकोला), जी.एस. विज्ञान कला व वाणिज्य महाविद्यालय (खामगाव), अमोलकचंद महाविद्यालय (यवतमाळ) आणि राजस्थान आर्यन कला, मिठूलाल कचोलिया वाणिज्य आणि सत्यनारायण रामकृष्ण राठी विज्ञान महाविद्यालय (वाशिम) या पाच केंद्रांवर आयोजित करण्यात आली आहे

परीक्षेची प्रवेशपत्रे संबंधित संशोधन केंद्राच्या लॉगिन आयडीवर 5 जुलैपर्यंत उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. तसेच सर्व पाच विषयांच्या प्रश्नपत्रिका नियोजित वेळेपेक्षा एक तास आधी प्युस सॉफ्टवेअरद्वारे ऑनलाइन उपलब्ध होतील. केंद्रप्रमुख व सहकेंद्रप्रमुखांनी त्या वेळी प्रश्नपत्रिका डाऊनलोड करून विद्यार्थ्यांच्या संख्येनुसार झेरॉक्स काढून परीक्षा सुरू होण्याआधी वितरित करणे अपेक्षित आहे.

परीक्षेनंतर विषयांचे गुण 14 ते 21 जुलै या कालावधीत प्राचार्य, केंद्रप्रमुख व विभागप्रमुख यांनी ऑनलाईन पद्धतीने संबंधित लॉगिन आयडीवर भरावयाचे आहेत. ऑफलाइन स्वरूपात गुण स्वीकारले जाणार नाहीत. तसेच वेळेत गुण सादर न केल्यास उद्भवणाऱ्या अडचणींसाठी संबंधित अधिकारी स्वतः जबाबदार राहतील, असे स्पष्ट करण्यात आले आहे.

या परीक्षेसंबंधीची माहिती सर्व संबंधित महाविद्यालयांचे प्राचार्य, केंद्रप्रमुख, विभागप्रमुख तसेच संशोधन केंद्रप्रमुख यांना देण्यात आली असून, त्यांनी आपल्या अधीनस्थ संशोधनार्थ्यांना यासंदर्भात माहिती देण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# अमरावती-मुंबई विमानसेवा आता आठवड्यातून केवळ दोन दिवस

## लोकांच्या अपेक्षांची फसवणूक




**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, (दि.2)** - अमरावतीकरांसाठी मोठ्या अपेक्षेने सुरू करण्यात आलेली अलायन्स एअरची अमरावती-मुंबई-अमरावती विमानसेवा आता आठवड्यातून फक्त दोनच दिवस होणार असल्याची माहिती सूत्रांकडून समोर आली आहे. यापूर्वी ही सेवा सोमवार, बुधवार आणि शुक्रवार असे आठवड्यातून तीन वेळा चालू होती. मात्र आता एक दिवसाने कपात करण्यात आली आहे. यामुळे प्रवाशांमध्ये नाराजीचा सूर उमटू लागला आहे. सेवा सुरू झाल्यापासून वेळेच्या अडचणी, उड्डाण रद्द होणे, रिकाम्या सीट्स असूनही जास्त भाडे अशा अनेक समस्यांचा प्रवाशांना सामना करावा लागला. तरीही अमरावतीकरांनी ही सेवा उचलून धरली होती. मात्र उड्डाणांची संख्या कमी करणे म्हणजे लोकांच्या अपेक्षांची फसवणूक असल्याची भावना व्यक्त होत आहे. कंपनीने सेवा बंद करण्याऐवजी वेळापत्रक सुधारून प्रवाशांची सोय पाहावी, अशी मागणी आता जोर धरू लागली आहे.

सूत्रांच्या माहितीनुसार, अद्याप अधिकृत घोषणा न झालेली असली तरी अलायन्स एअरने दोनच उड्डाणांसाठी तयारी सुरू केली आहे. ही सेवा सुरू करताना मोठ्या थाटामाटात उद्घाटन झाले होते.

मात्र, पहिल्या दिवसापासूनच वेळेबाबत प्रश्न उपस्थित होऊ लागले. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी देखील फ्लाइटच्या वेळेबद्दल चिंता व्यक्त केली होती. नवी मुंबई विमानतळ सुरू झाल्यावर वेळ सुधारण्याचे आश्वासन देण्यात आले होते, मात्र त्यानंतरही अडचणी कायम राहिल्या. एका प्रसंगी, विमानात इंधन भरणारा टँकर चिखलात अडकून उड्डाण रद्द करावे लागले होते. याशिवाय, सोशल मीडियावर विमानाच्या सुरक्षिततेबाबत चिंतेचे सूर उमटले होते. एअर इंडियाच्या अहमदाबाद अपघातानंतर तर अशा विमानांबाबत शंका आणखीनच वाढली. तसेच, जाहीर केलेले कमी भाडे 2499 रुपये असूनही प्रत्यक्षात 8000 रुपयांपर्यंत भाडे आकारले जात होते. विमानात जागा रिकामी असूनही दर कमी न करण्याबाबतही प्रवाशांनी नाराजी व्यक्त केली आहे. अमरावतीकरांचा ठाम विश्वास आहे की, उड्डाणांची संख्या कमी करण्याऐवजी वेळापत्रक सुधारल्यास प्रवासी संख्येत वाढ होईल, आणि ही सेवा प्रवाशांसाठीही आणि अलायन्स एअरसाठीही फायदेशीर ठरेल. सध्या या सेवेकडे कंपनी कोणत्या दृष्टीने पाहते यावरच तिचे भवितव्य अवलंबून राहणार आहे.

# जी.आर.सी.एस. स्कूलमध्ये पालखी सोहळा

## चिमुकल्यांच्या भक्तीभावात न्हालं विठ्ठलनाम



**महासागर प्रतिनिधी**

**तिवसा, (दि.2)**- येथील जी.आर.सी.एस. इंग्लिश प्रायमरी स्कूलमध्ये 1 जुलै रोजी चिमुकल्या विद्यार्थ्यांनी भक्तीमय वातावरणात आषाढी एकादशी निमित्ताने विठ्ठल-रुक्मिणी सोहळा उत्साहात साजरा केला.

या दिवशी शाळेच्या प्रांगणातून विठू माऊलीची पालखी निघाली. विठ्ठल-विठ्ठल जय हरि विठ्ठल च्या गजरात टाळ-मृदुंगाचा निनाद करत शोभायात्रा मार्गस्थ झाली. पारंपरिक पोशाखातील विद्यार्थ्यांनी विठ्ठल-रुक्मिणी, वारकरी व वादक यांची देखणी रूपं साकारली. काहींनी टाळ वाजवत, तर काहींनी भगव्या पताका हाती घेऊन परिसरात भक्तिभाव निर्माण केला.

मुख्याध्यापिका अनिता भुजाडे यांच्या मार्गदर्शनाखाली शिक्षिका अरुणा इंगोले, मोनाली पुनसे, शिवानी यादव, राजश्री भोंबे, कुमुद गोपाळे आणि उषा खैरकर यांनी कार्यक्रमात सक्रिय सहभाग घेतला. पालकवर्गही मोठ्या संख्येने उपस्थित राहून उत्सवाची शोभा वाढवली. चिमुकल्यांच्या निरागस भक्तीमुळे संपूर्ण परिसर विठ्ठलमय व मंगलमय झाला होता.

# अंबानगरीची 'सट्टा शहर' ही ओळख?

## भिंगरी सट्ट्याला राजकीय आश्रय घातक




**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.2 )** – शहरात भिंगरी सट्ट्याचा विळखा इतका घट्ट होत चालला आहे की, अंबानगरीची ओळख ही 'सट्टा शहर' नावाने होत असल्याची दिसत आहे. संगणक व मोबाइल ॲपच्या माध्यमातून दर 60 सेकंदांनी 'ओपन' होणारा हा डिजिटल सट्टा खुलेआम चालत असून, अनेक भागांत त्याच्या मुळ्या खोलवर रुजल्या आहेत.

या सट्ट्याचे वैशिष्ट्य म्हणजे संगणकावर फिरवली जाणारी भिंगरी, जिच्यावर नागरिक 10 रुपयांपासून हजारो रुपयांपर्यंत सट्टा लावतात. मोबाइल ॲप्स, खास सॉफ्टवेअर, आणि डिजिटल माध्यमांचा वापर करून हा जुगार अधिक सुलभ आणि वेगवान बनवला गेला आहे. यामुळे तरुण वर्ग, विशेषत: बेरोजगार युवक, मोठ्या संख्येने यात अडकत आहेत.

काही ठिकाणी पोलिसांनी छापे टाकून कारवाई केली असली तरी अनेक भागांमध्ये हा धंदा स्थानिक राजकीय संरक्षणाखाली असल्याचे आरोप नागरिकांकडून होत आहेत. प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे दररोज लाखो नाही तर कोटी रुपयांची उलाढाल सट्ट्याद्वारे होत असल्याचे सांगितले जाते. सट्टा चालक 'कमिशन'च्या नावाखाली मोठ्या प्रमाणावर रोख रक्कम वळवतात आणि ब्लॅक मनीचा व्यवहार करतात, अशीही माहिती समोर आली आहे.

या सट्ट्यामुळे अनेक कुटुंबांचे आर्थिक कंबरडे मोडले असून, कर्जबाजारी युवक आत्महत्या करीत असल्याच्या घटनाही घडल्या आहेत. त्यामुळे याप्रकरणी केवळ धाडी न टाकता गुन्हे दाखल करून कठोर कारवाई करणे अत्यावश्यक बनले आहे.

### सट्ट्याचे ठिकाणे : खुलेआम केंद्रे

- अंबापेठ, माया ब्युटी पार्लरसमोर, राजकमल चौक
- राजकमल चौक, जैन लॉटरी सेंटरजवळ
- सांस्कृतिक भवन व संस्कृती पानपट्टीजवळ
- रहाटगाव, देशी दारू दुकानाजवळ
- आठवडी बाजार, नवी बस्ती, बडनेरा
- इस्लामी चौक, जुनी वस्ती, बडनेरा
- सावता मैदान, जुनी बडनेरा
- सिपना कॉलेजजवळ
- यशोदा नगर, पोलिस चौकीजवळ
- राठी नगर चौक, -1 कॉम्प्लेक्सजवळ
- जकात नाका चौक, स्मोकिंग पांडा पानपट्टीजवळ
- राणा कॉम्प्लेक्सजवळ, काँग्रेस नगर रोड
- गाडगे नगर, बाबा पानपट्टीजवळ
- देवा माता रेस्टॉरंटजवळ, पंचवटी चौक
- मेघे कॉम्प्लेक्सजवळ, नवसारी रोड
- श्री हरी हॉटेलजवळ, हमालपुरा
- शंकर नगर, आमदार रवि राणा निवासाजवळ
- अंबादेवी रोड, अंबागेट परिसर

# कारचे काच फोडून 1.20 लाखांची रोकड चोरी

## चांदूर बाजार मधील टोम्पे महाविद्यालयाच्या आवारातील घटना

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.2 )** –अज्ञात चोरट्याने कॉलेज आवारात उभ्या असलेल्या लॉक असलेल्या चारचाकी वाहनाचे काच फोडून 1 लाख 20 हजार रुपयांची रोकड चोरून नेली. घटना मंगळवारी दुपारी 1 ते 2 वाजण्याच्या दरम्यान अमरावती-वलगाव रोडवरील टोम्पे कॉलेजच्या परिसरात घडली.

मिळालेल्या माहितीनुसार, अमरावती-वलगाव मार्गावर असलेले गो.सी. टोम्पे महाविद्यालय परिसरात प्रज्ञाचक्षु गुलाबराव महाराज वाचनालयासमोर चारचाकी वाहन (क्रमांक एमएच-27/एआर-3123) उभे होती. या वाहनात प्रा. जयंत बनसोड यांनी बँक ऑफ महाराष्ट्रमधून काढलेली 1 लाख 20 हजार रुपयांची रोकड ठेवून वाहन लॉक करून महाविद्यालयात गेले होते. दरम्यान, चोरट्याने ड्रायव्हर साईडची काच फोडून ही रोकड लंपास केली. सदर वाहन प्रा. रविंद्र डाखोरे यांचे असून, रोकड प्रा. जयंत बनसोड यांची होती. या प्रकरणी प्रा. जयंत बनसोड यांनी चांदूरबाजार पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली असून, पोलिसांनी अज्ञात चोरट्याविरोधात गुन्हा नोंदवून तपास सुरू केला आहे. विशेष म्हणजे, गेल्या सहा महिन्यांपासून चांदूरबाजार पोलीस ठाण्याच्या हद्दीत चोरी, घरफोडी व इतर गंभीर घटनांचा तपास करण्यात पोलिसांना एकाही प्रकरणात यश आलेले नाही. शहर व परिसरात सध्या घरफोडी, खिसेकापू व चोरीच्या घटनांमध्ये मोठी वाढ झाली आहे. गेल्या महिन्यात 8 लाख रुपयांची चोरी झाली होती, तर मागील आठवड्यात एसटी बसस्थानकावरून एका महिलेकडून 6 लाखांचे दागिने लुटण्यात आले होते. या प्रकरणांची तपासणी सुरू असतानाच मंगळवारी दुपारी 1 ते 2 वाजण्याच्या दरम्यान अमरावती-वलगाव रोडवरील टोम्पे कॉलेजच्या परिसरात एक नवीन चोरीची घटना घडली.

# कोल्हाला वाहनाची धडक, वन विभागाचे दुर्लक्ष

**महासागर प्रतिनिधी**

**धारणी, ( दि.2 )** - धारणी-बुरहानपूर महामार्गावर मंगळवारी पहाटे एका कोल्हाला वाहनाची धडक बसून त्याचा मृत्यू झाला. ही घटना वसंतराव नाईक महाविद्यालयासमोर घडली असून, हे ठिकाण धारणी वनपरिक्षेत्र कार्यालयापासून अवघ्या दोन किलोमीटर अंतरावर आहे. दुर्दैवाची बाब म्हणजे, अनेक तास उलटून गेले तरीही वनविभागाकडून घटनास्थळी ना पंचनामा करण्यात आला, ना मृत सियाराचा मृतदेह उचलण्यात आला. परिणामी, मृत सियाराचे शरीर इतर वाहनांच्या धडकेत चुरगाळले गेले आणि ते अत्यंत विखुरलेले व विद्रूप झाले. वन्यजीव संवर्धनासाठी सरकार कोट्यवधी रुपये खर्च करत असताना, अशा प्रकारची असंवेदनशीलता आणि हलगर्जीपणा वनविभागाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह निर्माण करतो. एवढ्या जवळच कार्यालय असूनही वेळेवर कारवाई न होणे, ही गंभीर बाब आहे. वन्यजीवांच्या सुरक्षेची जबाबदारी असलेल्या अधिकाऱ्यांकडून अशी दुर्लक्ष झाल्यास जंगलातील इतर प्राणीही धोक्यात येऊ शकतात.

# रोशनखेड रेल्वे क्रॉसिंगजवळ युवकाचा मृतदेह आढळला

## आत्महत्येपुर्वी कुटूंबियांना केला फोन



**महासागर प्रतिनिधी**

**वरुड,( दि.2 )**– वरुड-रोशनखेडा महामार्गावरील रेल्वे क्रॉसिंगजवळ एका युवकाचा मृतदेह आढळल्याने परिसरात मोठी खळबळ उडाली आहे. मृतकाचे नाव अंकुश पेठे (रा. हातुर्णा) असे असून, घटनेमुळे संपूर्ण तालुक्यात चिंतेचे वातावरण पसरले आहे.

ही घटना सोमवारी उघडकीस आली. अंकुश पेठे यांचा मृतदेह रेल्वे रुळाजवळ आढळून आला, त्याच्या जवळ विषारी औषधाची बाटली आढळली असल्याची माहिती पोलिसांनी दिली. त्यामुळे प्रथमदर्शनी ही आत्महत्येची शक्यता असल्याचे बोलले जात आहे. मात्र, शवविच्छेदनाच्या अहवालानंतरच मृत्यूचे खरे कारण स्पष्ट होईल, असे वरुड पोलिसांनी सांगितले. घटनेच्या पार्श्वभूमीवर आणखी एक धक्कादायक माहिती समोर आली आहे की, अंकुशने आत्महत्या करण्याआधी आपल्या कुटुंबियांना फोन करून ही माहिती दिली होती. तो बहिणीकडे भेट देऊन हातुर्णा परत जात असताना त्याने फोनवरून आत्महत्येचा इशारा दिला. कुटुंबीयांनी त्याचा शोध घेतला, मात्र तो मिळून आला नाही आणि अखेर त्याचा मृतदेह आढळून आला. या घटनेत एक दुःखद बाब अशी आहे की, काही वर्षांपूर्वी अंकुशच्या थोरल्या भावानेही आत्महत्या केली होती. आता अंकुशच्या मृत्यूनंतर त्याचे आई-वडील पूर्णपणे एकटे पडले आहेत, त्यामुळे कुटुंबावर दुहेरी आघात झाला आहे. पोलिसांनी घटनेचा तपास सुरू केला आहे. हत्या झाली असल्यास कुणाचा सहभाग आहे याचा शोध घेतला जात आहे. अंकुशच्या कॉल डिटेल्स, घटनास्थळी आढळलेल्या वस्तू, व मागील काही दिवसांतील मानसिक स्थिती याचा तपास केला जात आहे.

# 'स्पा 99' मसाज सेंटरवर पोलिसांचा छापा; वेश्या व्यवसाय उघड

## नेक्स्ट लेवल मॉलमध्ये कारवाई







**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि. 2 )**– पोलीस आयुक्त अरविंद चावरीया यांनी शहरातील अवैध व्यवसायांना आळा घालण्यासाठी गुन्हे शाखेच्या अधिकाऱ्यांसोबत विशेष बैठक घेऊन कडक मोहीम राबवण्याचे आदेश दिले होते. या पार्श्वभूमीवर आज गाडगेनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीतल्या नेक्स्ट लेवल मॉल मधील 'स्पा 99' या मसाज सेंटरवर पोलिसांनी छापा टाकून वेश्या व्यवसाय उघडकीस आणला.

वरिष्ठ पोलीस निरीक्षक संदीप चव्हाण यांना गुप्त बातमीदारामार्फत मिळालेल्या माहितीवरून ही कारवाई करण्यात आली. नेक्स्ट लेवल मॉल मधील पहिल्या मजल्यावरील 'स्पा 99' या मसाज सेंटरमध्ये मसाज थेरपीच्या नावाखाली बेकायदेशीर वेश्या व्यवसाय सुरू असल्याचे उघड झाले. गुन्हे शाखा युनिट 2 व पंचांच्या मदतीने केलेल्या छाप्यात, पंटरच्या इशाऱ्यावरून कारवाई करताना, सेंटरमधून आक्षेपार्ह वस्तू, मोबाईल फोन्स व 1,14,700 चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. कारवाईदरम्यान अटक करण्यात आलेल्या मॅनेजरचे नाव गोपी निरनसींग भवरसींग पंडया (वय 35, रा. दस्तुर नगर, अमरावती) असे आहे. पंडयाकडून चौकशी केली असता, स्पा सेंटरचे मालक राकेश रावल (रा. तहसील नावरा, रतलाम, मध्यप्रदेश) आणि दुकान मालक अभिजीत दिलीप लोखंडे (वय 38, रा. जुनी बस्ती, रहाटगाव, अमरावती) असल्याची माहिती मिळाली. लोखंडे सध्या फरार आहे. या घटनेप्रकरणी अनैतिक मानवी व्यापार प्रतिबंधक अधिनियम अंतर्गत गाडगेनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास सुरू आहे.ही कारवाई पोलीस आयुक्त अरविंद चावरीया, उपायुक्त गणेश शिंदे, कल्पना बारवकर, सागर पाटील व सहाय्यक पोलीस आयुक्त शिवाजी बचाटे यांच्या मार्गदर्शनाखाली, निरीक्षक संदीप चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आली. या पथकात सपोनि महेश इंगोले, पोउपनि संजय वानखडे, तसेच महिला पोलीस व इतर कर्मचारी सहभागी होते.

# जिल्हा बँकेचे संचालक आनंद काळे यांना अपात्रतेची नोटीस

- 14 जुलैपर्यंत खुलासा सादर करण्याचे आदेश
- बच्चू कडू गटाला पुन्हा धक्का

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि. 2 )**– जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेमध्ये पुन्हा एकदा राजकीय घडामोडींना वेग आला आहे. बँकेचे अध्यक्ष बच्चू कडू यांना मागील महिन्यात अपात्रतेची नोटीस बजावण्यात आली होती. त्यानंतर आता त्यांच्या गटातीलच संचालक आनंद नंदकुमार काळे यांनाही विभागीय सहनिबंधकांनी सोमवारी (दि. 30 जून) अपात्रतेची नोटीस बजावली आहे. त्यांना 14 जुलैपर्यंत खुलासा सादर करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

हि नोटीस महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम 1960 चे कलम 78 अ अंतर्गत बजावण्यात आली असून, संचालक हरीभाऊ मोहोड व इतर 11 संचालकांनी 21 एप्रिल रोजी आनंद काळे यांच्या विरोधात तक्रार दाखल केली होती. त्यांच्या तक्रारीनुसार, आनंद काळे यांनी संचालकपदावर आरूढ झाल्यानंतर बँकेचे कामकाज मनमानीपणे व संस्थेच्या हिताविरुद्ध केले. त्यांच्यावर फसवणुकीचा (कलम 420) गुन्हा दाखल आहे. तसेच, प्रवास भत्त्याच्या नावाखाली 2 लाख 28 हजार 328 रुपयांचे अनधिकृत बिल त्यांनी बँकेकडून उचलले होते.

21 नोव्हेंबर 2024 रोजी झालेल्या बँकेच्या सभेत हा खर्च नामंजूर करण्यात आला होता आणि संबंधित रक्कम बँकेत जमा करण्याचे आदेश देण्यात आले होते.

तरीही त्यांनी खर्चाची परतफेड न केल्याने हे गंभीर आर्थिक अपहार ठरले. त्यानुसार विभागीय सहनिबंधकांनी त्यांना नोटीस बजावत स्पष्ट केलं आहे की, खुलासा समाधानकारक न आढळल्यास त्यांना अपात्र घोषित करण्यात येईल. या नोटीसमुळे बच्चू कडू यांच्या गटाला मोठा धक्का बसला आहे. अपात्र ठरल्यास आनंद काळे यांना पुढील पाच वर्षे कोणतीही निवडणूक लढवता येणार नाही, अशी स्पष्ट अधिसूचना नोटीसमध्ये देण्यात आली आहे.

# महापालिकेच्या नगर रचना विभागाचा कार्यभार नम्रता बोबडेंकडे

## फेसबुक लाईव्हवरून जनसामान्यांच्या समस्या मांडल्यानंतर प्रशासनाचा निर्णय




**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.2 )** – अमरावती महानगरपालिकेच्या नगर रचना विभागाचे सहायक संचालक घनश्याम वासुदेवराव वाघाडे हे 23 जून 2025 पासून अनुपस्थित असल्यामूळे विभागात नागरिकांच्या कामांवर गेल्या दहा दिवसांपासून परिणाम होत होता. वाघाडे यांच्या अनुपस्थितीमुळे नगर रचना विभागात येणाऱ्या नागरिकांना काम न होता माघारी जावे लागत होते. या प्रकाराचा फेसबुक लाईव्ह केल्यानंतर प्रशासनाचे दखल घेत या विभागाचा कार्यभार सहायक संचालक, नगर रचना नम्रता बोबडे यांच्याकडे देण्यात आला.


दैनिक महासागर चे प्रतिनिधी मनीष जगताप यांनी 2 जुलै रोजी फेसबुक लाईव्ह करून वाघाडे यांच्या अनुपस्थितीमुळे निर्माण झालेल्या समस्यांकडे प्रशासनाचे लक्ष वेधले. नागरिकांच्या अस्वस्थतेची आणि शासकीय व्यवस्थेतील दिरंगाईची प्रखर नोंद घेत ही माहिती समाजमाध्यमांद्वारे अधिकाऱ्यांपर्यंत पोहोचली. त्यानंतर प्रशासनाने हालचाल केली आणि वाघाडे यांनी 23 जून ते 2 जुलै 2025 या कालावधीसाठी परिवर्तित रजेचा अर्ज सादर केल्याचे उघड झाले. या रजेचे कारण त्यांनी वैद्यकीय कारणे असे दिले असून, यावर स्वतंत्र कार्यवाही केली जाणार आहे, असे अधिकृतपणे स्पष्ट करण्यात आले.

### पुढील आदेशापर्यंत सांभाळणार कार्यभार

दरम्यान, नागरिकांच्या कामांमध्ये अडथळा निर्माण होऊ नये व प्रशासनिक कामकाज सुरळीत पार पडावे, यासाठी पुणे कार्यालयाचे,संचालक, नगर रचना, प्र.मुख्य प्रशासकीय अधिकारी र.ना.बालमवार यांनी नगर रचना सहायक संचालक (अमरावती शाखा) नम्रता मधुकरराव बोबडे यांच्याकडे त्यांच्या पदाबरोबरच अमरावती महानगरपालिकेतील नगर रचना विभागाचा अतिरिक्त कार्यभार सोपवला आहे. यासंदर्भात अधिकृत आदेश जारी करण्यात आला असून, बोबडे या 2 जुलैपासून पुढील आदेश येईपर्यंत वाघाडे यांच्या अनुपस्थितीत विभागाचा कार्यभार पाहणार आहेत.

### रखडलेली कामे लागतील मार्गी

या निर्णयामुळे आता नगर रचना विभागातील नागरिकांची कामे सुरळीत सुरू होतील अशी अपेक्षा आहे. सोशल मीडियाच्या माध्यमातून नागरिकांच्या प्रश्नांवर तत्काळ निर्णय घेतला गेल्याने ही घटना प्रशासनासाठी एक सकारात्मक इशारा ठरली आहे. सोशल मीडियाचे माध्यम प्रशासनापर्यंत पोहचण्यासाठी आता प्रभावी मंच ठरत असल्याचे पुन्हा एकदा अधोरेखित झाले आहे.



महाराष्ट्र शासन

नगर रचना आणि मूल्यनिर्धारण विभाग

:- कार्यालयीन आदेश :-

:- आदेश :-

# खा. बळवंत वानखडे यांनी दाखविली हिरवी झेंडी

## नवीन अमरावती स्थानकावरून पंढरपूर विशेष रेल्वे गाडी रवाना




**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि.2 )**– आषाढी एकादशीच्या पार्श्वभूमीवर एक ऐतिहासिक क्षण नवीन अमरावती रेल्वे स्थानकावर अनुभवायला मिळाला. खासदार बळवंत वानखडे यांच्या हस्ते पंढरपूरकडे जाणाऱ्या विशेष रेल्वे गाडीला हिरवा झेंडा दाखवण्यात आला. या प्रसंगी स्टेशन परिसर भक्तिमय वातावरणाने भारलेला होता आणि शेकडो वारकरी हरिनामाच्या गजरात गाडीमध्ये सहभागी झाले.



रेल्वे प्रशासनाने वारकऱ्यांच्या सोयीसाठी विशेष रेल्वे सेवा उपलब्ध करून दिली असून ही गाडी पहिल्यांदाच नवीन अमरावती स्थानकावरून रवाना झाली आहे. गाडीच्या स्वागतासाठी पारंपरिक वाद्य, फुलांची सजावट आणि स्वयंसेवकांच्या सेवाभावी उपक्रमांची भरपूर तयारी करण्यात आली होती. खासदार बळवंत वानखडे यांनी आपल्या भाषणात सांगितले की, अमरावती जिल्ह्यातील भाविकांना थेट पंढरपूरची सुविधा मिळावी, यासाठी आम्ही रेल्वे प्रशासनाकडे सातत्याने पाठपुरावा केला आणि आज तो यशस्वी झाला. वारकऱ्यांना स्टेशनवर स्वागत किट, पिण्याचे पाणी आणि स्वयंसेवकांच्या मदतीने सुविधा देण्यात आली. गाडी सुटताना ज्ञानोबा माऊली तुकाराम च्या जयघोषात संपूर्ण परिसर दुमदुमून गेला. यावेळी रेल्वेचे वरिष्ठ अधिकारी तसेच मिलिंद चिमोटे, विलास इंगोले, प्रवीण मनोहर, समाधन वानखडे, संजय थोरात, ओमप्रकाश बनसोड, विजय गणवीर, जयश्री वानखेडे, मिताली पाटील आदी प्रतिष्ठित व्यक्ती उपस्थित होते. वारकरी मंडळांचे पदाधिकारी आणि अनेक समाजसेवक यांनीही उत्स्फूर्त सहभाग घेतला.

## एक तरी वारी अनुभवावी!




पंढरपूर वारी म्हणजे महाराष्ट्राच्या भक्ती परंपरेचा प्राण. अमरावती स्थानकावरून शेकडो वारकरी पंढरपूरला रवाना झाले. या वेळी तुषार भारतीय मित्र परिवार तर्फे रेनकोट, साबुदाणा खिचडी व प्राथमिक औषध वाटप, तसेच ज्येष्ठ वारकरी व रेल्वे कर्मचारी यांचा सत्कार करण्यात आला. या उत्सवाचा साक्षीदार होण्यासाठी माजी स्थायी सभापती तुषार भारतीय यांच्या नेतृत्वात चेतन गावंडे, प्रशांत शेंगोकर, सुनंदा खरड, गजू कोल्हे, मंदार नानोटी, बंडू विघे, शुभम वैष्णव, आदित्य कर्डीकर, संतोष पिडेकर, विवेक पांडे, श्रीलेश खांडेकर, अशोक गाडे, सुनील चौकडे आदी अनेक मान्यवर नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. ही गाडी आणि हा उत्सव भाविकांसाठी श्रद्धेचा, सेवाभावी संस्था व समाजासाठी एक प्रेरणादायी उपक्रम ठरला आहे. पंढरीच्या वाटेवर निघालेल्या प्रत्येक वारकऱ्याला सुखद, सुरक्षित आणि भक्तिमय प्रवासाची अनुभूती मिळो हीच सदिच्छा!

# महिलेचा विनयभंग

**अमरावती** – शिरखेड पोलीस ठाण्याच्या हद्दीतील एका 60 वर्षीय महिला बाजारात गेली असताना, आरोपी राजू रामदास सोनोने (वय 45, रा. दाभेरी, ता. मोर्शी) याने अश्लील वर्तन करत तिचा विनयभंग केला. महिलेच्या तक्रारीवरून शिरखेड पोलिसांनी आरोपीविरोधात गुन्हा दाखल केला आहे.


**Changed From Name and Date of Birth**

I Antakala, Mother of Dudande Manoj Sahebrao

**Resident of Address**

At-Lasur Post Dhamoli Ta Dapyapur Dist Amaravati State - Maharastra pin 444803 have changed my name from Anita to, Antakala Sahebrao Dudande and my Date of birth from 7 November 1967 to 3 Aug 1965Vide Affidavit Dated-30 June 2025 betome Nayk Tahsildar Ta- Daryapup Dist Amravati (Maharastra).

**प्लाट विकणे आहे**

**प्लाट फक्त 6 लाख 51 हजार रुपये मध्ये**

अमरावती पासून जवळच तेही फक्त 25 ते 30 मिनिटांच्या अंतरावर

संपर्क

7972805778

7620765180



आरएनआय ४६९७५/१९८५ महासागर अमरावती

मालक, मुद्रक, प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर १८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक, अमरावती येथे प्रकाशित केले. संपादक -श्रीकृष्ण तनसुखदास चांडक ( पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर राहील ) अमरावती मुख्य कार्यालय, पत्ता. दैनिक महासागर, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक अमरावती, फोन नं. ९५१८९३४५०४

